# मुंबई विद्यापीठ

क्र. संलग्नता/आयसीसी/(२०२५–२६)/09 /२०२५

## परिपत्रक:

विषय:—मुंबई विद्यापीठाशी संलग्नित शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक या पदाबाबत.

संदर्भ:— १) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांचे पत्र क्र. ससं/उशि/मुंवि/मराठी भाषापंधरवडा/२०२५/२२०१, दि. १७ एप्रिल, २०२५ रोजीचे पत्र

२) संचालनालय पुणे यांचे पत्र क्र. **DHEPN-MV11012/274/2024-COLLWGI E-Comp. No. 910181, dt. 31.3.2025**

उपरोक्त संदर्भाधिन विषयास अनुसरून सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांना अवगत करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक या पदाबाबतची माहिती खालील दिलेल्या गुगल लिंकवर तात्काळ भरण्यात यावी. सदर माहिती शासनास सादर करणे आहे.

**Google Form Link :- https://forms.gle/HSd49wiE2B1BA1Cc7**

ठिकाण : मुंबई–४०० ०३२
दिनांक : २२ एप्रिल, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

महाराष्ट्र शासन
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई-४००००१
ई.मेल- jdhemumbai@gmail.com, दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६५६६००, web.www.jdhemumbai.gov.in

क्र.ससं/उशि/मुंवि/मराठी भाषापंधरवडा/२०२५/ २२० । दिनांक- १३/०४/२०२५

प्रति,
सर्व, प्राचार्य,शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
कला,वाणिज्य, विज्ञान,विधी,शिक्षणशास्त्र
तसेच शारीरिक शिक्षण महाविद्यालये,मुंबई विभाग.

**विषय-मुंबई विद्यापीठाशी संलग्नित शासकीय,अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक या पदाबाबत.**
**संदर्भ-संचालनालय पुणे यांचे पत्र क्र.DHEPN-MV11012/274/2024-COLLWGI E-Comp.No:910181, Dt.31.03.2025**

उपरोक्त विषयास अनुसरून संचालनालय उच्च शिक्षण पुणे यांचे संदर्भीय पत्र अवलोकनार्थ सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावरून शासकीय/अशास्कीय अनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयांची विहित प्रपत्रातील माहिती मागविण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित प्रपत्रातील माहिती खालील गुगल लिंक द्वारे सादर तात्काळ करण्यात यावी.

गुगल लिंक- **https://forms.gle/HSd49wiE2B1BA1Cc7**

सहसंचालक,
(डॉ. रुपेश राऊत)
उच्च शिक्षण, मुंबई विभाग,मुंबई.

प्रति,
१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई २. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,मुंबई. यांना कळविण्यात येत की, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांशी सबंधित माहिती या कार्यालयास स्वतंत्रपणे सादर करण्यात यावी.

# महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२१११

File No.: DHEPN-MVI1012/274/2024-COLLWG1 E-Comp. No.: 910181

तात्काळ/ न्यायालयीन प्रकरण/ कालमर्यादा

प्रति,

१. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई
२. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल

**विषय- मुंबई विद्यापीठाशी संलग्नित शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक या पदाबाबत.**

**संदर्भ**
१. शासन पत्र क्र. संकीर्ण/ प्र.क्र.०३./२४/मशि-५ दि. १५.०१.२०२४
२. शासन पत्र क्र. संकीर्ण/ १०२१/ प्र.क्र. १७७/ २४/ मशि-५ दि. १०.०६.२०२१
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/ पदभ/ मवि-१/ २०२१/ १०९४९दि. ०६.१०.२०२१
४. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/पदभ/११२१/ प्र.क्र.१०/मवि-१/१२९४४ दि. ३.११.२०२१
५. संचालनालयाचे पत्र क्र. DHEPN-MVI१०१२/ २७४/ २०२४- COLLWG१ I/ ६६४५२८/ २०२४ दि. ०६.११.२०२४
६. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल यांचे पत्र क्र. विससं/ उशि/ कोविप/मशि/ २०२५ दि. २७.०१.२०२५
७. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र. ससंउशी/न्याप्र/ संशशी/ २०२५/७८५ दि. २९.०१.२०२५
८. संचालनालयाचे पत्र क्र. DHEPN-MVI१०१२/२७४/२०२४-COLLWG१ E-Comp. No.:९१०१८१ दि. १७.०२.२०२५
९ शासन पत्र क्र.HTED E- No.: 1021369/42/2025-MHT-(HE-5) दि. ११.०३.२०२५
१०. संचालनालयाचे पत्र क्र. DHEPN-MVI१०१२/२७४/२०२४-COLLWG१ E-Comp. No.:९१०१८१ दि. १९.०३.२०२५
११. शासन पत्र क्र. HTED E- No.: 1021369/42/2025-MHT-(HE-5) दि. २८.०३.२०२५

उपरोक्त विषयांकीत प्रस्ताव संचालनालयाचे पत्र दि. १७.०२.२०२५ व दि. १९.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला होता.

प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावरून शासकीय / अशासकीय अनुदानित/ कायम विना अनुदानित महाविद्यालयांची माहिती विहीत विवरणपत्रांमध्ये मागविण्यात आली आहे. सोबत शासन पत्र व सोबतचे विवरणपत्र अ,ब,क व ड जोडले आहे.

ज्या कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये सद्यस्थितीत शारीरिक शिक्षण संचालक पद अस्तित्त्वात नाही अशा महाविद्यालयांची नावे, महाविद्यालयांमध्ये पदनिर्मिती करण्याची कार्यपध्दती काय आहे व विद्यापीठ अनुदान आयोग किंवा शासनाच्या कोणत्या धोरणानुसार या महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण संचालक पद निर्माण करणे आवश्यक आहे, याबाबतचा तपशील स्वतंत्रपणे नमूद करावा.

शासनाने विहीत केलेल्या विवरणापत्रातील रकान्यांमध्ये बदल अथवा खाडाखोड करू नये, रकान्यांची संख्या कमी जास्त करू नये.

प्रस्तुत प्रकरणी शासनपत्र दि. २८.०३.२०२५ अन्वये उपस्थित मुद्यांबाबत आपल्या कार्यक्षेतील महाविद्यालयांची माहिती ई-ऑफीस व ई-मेल द्वारे दि. ०५.०४.२०२५ अखेर निश्चितपणे संचालनालयास सादर करण्यात यावी.

सोबत- वरीलप्रमाणे.

Signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 31-03-2025 16:00:10

**( डॉ. प्रकाश बच्छाव )**
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय (विस्तार), दालन क्र. ४१६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मुंबई ४०००३२.

दुरध्वनी क्र.०२२/२२७९३१७७ Email ID: mashi५-hted@mah.gov.in

**HTED-E-Com.No.1021369/2025-MHT-(HE-5)** दिनांक:- २८ मार्च, २०२५

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक या पदाबाबत.

संदर्भ :- १. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.DHEPNMVI १०१२/२७४/२०२४-COLLWGI-E-Comp.No-९१०१८१, दिनांक १९.३.२०२५

२. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.DHEPN-MVI१०१२/ २७४/२०२४-COLLWGI-E-Comp.No-९१०१८१, दिनांक १७.२.२०२५

उपरोक्त विषयाधिन प्रकरणी याचिकाकर्ते यांनी मुंबई विद्यापीठाच्या अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण संचालक पद निर्माण करण्याबाबत रिट याचिकेव्दारे मागणी केलेली आहे.

२. सदर रिट याचिकेच्या पार्श्वभूमीवर संचालनालयाने मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण संचालक पद निर्माण करण्यात आलेले नाही, त्या महाविद्यालयामध्ये सदर पद निर्माण करावयाचे झाल्यास त्याबाबतचा तपशिल दिनांक १७.२.२०२५ च्या पत्रान्वये शासनास सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक ११.३.२०२५ च्या पत्रान्वये अतिरिक्त मुद्यांची माहिती मागविण्यात आली. त्यानुसार

संचालनालयाने दिनांक १९.३.२०२५ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे.

३. शासनाने मंत्रीमंडळाच्या मान्यतेने सन २००१ पासून कायम विनाअनुदान धोरणाचा स्विकार केला आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये अशासकीय नविन महाविद्यालय/अशासकीय महाविद्यालयातील नविन विद्याशाखा/अशासकीय महाविद्यालयातील नविन पदांना केवळ कायम विनाअनुदान स्वरुपात मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे. सदर बाब यापुर्वी शासनास पाठविलेल्या प्रस्तावात नमूद केलेली दिसून येत नाही.

४. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने उप सचिव, मशि यांच्या दालनामध्ये सहसंचालक, मुख्यालय आणि सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई व सहसंचालक, कोकण विभाग, पनवेल यांच्याशी दिनांक २४.३.२०२५ रोजी समक्ष चर्चा करण्यात आली. या चर्चेत असे निर्देशनास अले की, याचिकाकर्ते यांनी रिट याचिकेमध्ये मुंबई विद्यापीठाच्या अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण संचालक पद निर्माण करण्याबाबत रिट याचिकेव्दारे मागणी केलेली आहे. परंतू संचालनालयाने केवळ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांशी संबंधित तपशिल शासनास सादर केला आहे.

५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक १३.७.२०१३ नुसार राज्य क्रिडा व युवा धोरण- २०१२ चे अमलबजावणी करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालयात गरज नसलेल्या मंजूर पदांचे समर्पन करुन **मंजूर पदांतर्गतच** प्राधान्याने शारीरिक शिक्षण संचालक पदाची निर्मीती करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

६. त्यामुळे अशासकीय अनुदानित व अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयांकडील अनुज्ञेय विद्यार्थीसंख्या, प्रवेशित विद्यार्थी संख्या, उपलब्ध क्रिंडागण सुविधा, अन्य पद समर्पित करुन शारीरिक शिक्षण संचालक पद निर्माण करण्यास संस्थेची सहमती, संबंधित महाविद्यालयांमध्ये संरक्षित/अतिरिक्त पदे असल्यास त्याबाबतचा तपशिल, इत्यादी मुद्यांविषयी सविस्तर तपशिलाची आवश्यकता आहे.

७. तसेच, संबंधित विनाअनुदानित महाविद्यालयांची नावे व अशा महाविद्यालयांमध्ये पदनिर्मितीची करण्याची कार्यपध्दती काय आहे व विद्यापीठ अनुदान आयोग किंवा शासनाच्या कोणत्या धोरणानुसार या महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण संचालक पद निर्माण आवश्यक आहे, याबाबतचाही तपशिल नमदू करावा.

उपरोक्त बाबी विचारात घेवून सदर पत्रासोबत जोडलेल्या विवरणपत्र अ, ब, क व ड मधील महाविद्यालयनिहाय तपशिल तसेच परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या बाबींचा तपशिल आवश्यक कागदपत्रांसह शासनास दिनांक १६.०४.२०२५ पूर्वी कोणत्याही विलंबाविना सादर करावा.

Signed by Nitin Shankar Kshirsagar
Date: 28-03-2025 11:24:48

(नि.शं.क्षिरसागर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत – विवरणपत्र

प्रत-

1. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई
2. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल
3. निवडनस्ती/मशि-५

# विवरणपत्र-अ

## ज्या महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण पद मंजूर नाही त्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचा तपशिल

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नावं | अनुदानित विद्याशाखा | प्रवेश क्षमता | प्रत्यक्ष प्रवेशीत विद्यार्थी संख्या | क्रिडांगणाबाबत तपशिल | | | | | | इनडोअर क्रिडा प्रकारासाठी असणाऱ्या सुविधा | इनडोअर क्रिडा साठी स्वतंत्र जागा (आहे/ नाही) | असल्यास क्षेत्रफळ | इनडोअर खेळांचा तपशिल | पद समर्पित करण्यास सहमती दर्शविली आहे काय (हमीपत्र) | असल्यास, पद समर्पित करावया च्या पदाचे नाव व समर्पित करावयाचे कारण | समर्पित केलेल्या अनुदानित पदांची भविष्यात अनुदान तत्वावर मागणी करणार नसल्याचे हमीपत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | क्रिडांगण स्वमालकीचे (आहे/नाही) | क्षेत्रफळ | भाडे त्वत्वावर असल्यास (आहे/ नाही) | क्षेत्रफळ | अन्य सुविधा (आहे/ नाही ) | असल्यास तपशिल | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

# विवरणपत्र-ब

## ज्या महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण पद मंजूर नाही त्या अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा तपशिल

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | अनुदानित विद्याशाखा | प्रवेश क्षमता | प्रत्यक्ष प्रवेशीत विद्यार्थी संख्या | क्रिडांगणाबाबत तपशिल | | | | | | इनडोअर क्रिडा प्रकारासाठी असणाऱ्या सुविधा | इनडोअर क्रिडा साठी स्वतंत्र जागा (आहे/ नाही) | असल्यास क्षेत्रफळ | इनडोअर खेळांचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | क्रिडांगण स्वमालकीचे (आहे/नाही) | क्षेत्रफळ | भाडे त्वत्वावर असल्यास (आहे/नाही) | क्षेत्रफळ | अन्य सुविधा (आहे/ नाही ) | असल्यास तपशिल | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

## विवरणपत्र-क

ज्या महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण संचालक पद मंजूर नाही त्या शासकीय महाविद्यालयांचा तपशील.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | शारीरिक शिक्षण संचालक पद मंजूर नसल्याचे कारण | पद मंजूर करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर केले आहे का? | शासनाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |

## विवरणपत्र- ड

ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण संचालक पद मंजूर नाही अशा महाविद्यालयांचा तपशील.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | विषय | दि. ०१.१०.२०१७ नुसार | | | | | | मार्च, २०२५ अखेरची स्थिती | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कार्यभार | कार्यभारानुसार अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अतिरिक्त पदे | संरक्षित पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |